| | |
|---|---|
| MHRG100008662014 | दाखल दिनांक : ०१/१०/२०१४<br>नोंदणी दिनांक : ०१/१०/२०१४<br>निकाल दिनांक : १०/०३/२०२६<br>कालावधी : ११ वर्ष ०५ महिने ०९ दिवस |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड, यांच्या न्यायालयात**
**{ पीठासीन अधिकारी श्रीमती पी. एस. माळी }**

**नियमित फौजदारी खटला क्र. ११५/२०१४**

**निशाणी : ८८**

महाराष्ट्र शासन
(महाड शहर पोलीस ठाणे) ... सरकारपक्ष

विरुध्द

१. महम्मद परवेझ ताहिर शेख,
वय : २२ वर्षे, धंदा : चालक,
रा. माजिद पाटनर याची खोली, मन्नान कॉलनी,
तळोजा गाव, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड,
२. शादाफ अफरोझ कुरैशी,
वय : १८ वर्षे, धंदा : क्लिनर,
रा. घर नं. ७०९, मन्नान कॉलनी,
तळोजा गाव, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड,
३. अब्दुल हमीद अब्दुल गफुर पटेल,
वय : ४० वर्षे, धंदा : खाजगी व्यवसाय,
रा. अकला मोहल्ला, कमरोद्दीन राईस मिलच्या मागे,
तळोजा गाव, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
४. सलीम इसाक कापडी,
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,
रा. कोंडीवरे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी ... आरोपी

<u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के. व्ही. कदम</u>

<u>आरोपींकरीता अधिवक्ता श्री. आर. आर. गांधी</u>

## : <u>न्या य नि र्ण य</u> :

(<u>दिनांक १० मार्च, २०२६ रोजी न्यायालयात घोषित</u>)

१. आरोपी 'भारतीय दंड विधानचे' कलम — ३७९, ४२९ सह कलम ३४, मुंबई पोलीस कायदा कलम ११९, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११(१)(अ), महाराष्ट्र किपींग ॲण्ड मुव्हमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट, १९७६ कलम — १३, महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, १९७६ चे कलम ५ दंडनीय कलम ९, कलम ६ दंडनीय कलम ९—अ, कलम ११ दंडनीय कलम ९—अ, पशु वाहतुक अधिनियमाचे कलम ४७—अ, ४८, ४९, ५०, ५४ व ५६ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे शिक्षापात्र कलम ३८(३) व मोटार वाहन कायद्याचे कलम १३०(१) दंडनीय कलम १७७ अन्वये दोषारोपास सामोरे जात आहेत.

२. <u>खटल्यातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे</u> :

घटना दिनांक २८/०६/२०१४ रोजी रात्री ४.४५ वाजताचे सुमारास मौजे दासगांवचे पुढे दासगांव खिंडीत घडलेली आहे. आरोपी क्र. १ व २ यांचे ताब्यातील बोलेरो पीकअप गाडी क्र. एम.एच.—४६—ई.—५८४९ मध्ये आरोपी क्र. ४ याने दोन वर्ष वयाचा बैल, अडीच वर्ष वयाची जावरी जातीची गाय, चार वर्ष वयाची गावठी जातीची एक गाय, एक वर्ष वयाचा कालवड, चार वर्ष वयाची कबरी जातीची गाय, सहा वर्ष वयाची जावरी जातीची गाय, एक वर्ष वयाचा तांबुस रंगाचा कालवड, एक वर्ष वयाचा काळया रंगाचा कालवड त्यांचेकडे जनावरे वाहतुकीचा कोणताही परवाना नसताना, अधिकृत प्रमाणपत्र न बाळगता,

कोणतेही प्रथमोपचाराचे साहित्य न बाळगता, जनावरांना रोगप्रतिबंधक लसी न देता, कोणतेही पशु वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत न बाळगता, जनावरांबाबत कोणतीही आवश्यक माहिती कोणत्याही ठळक लाल अक्षराने न लिहीता, पीकअप जीपमध्ये पुरेसे अन्न, चारा, पाणी व खेळती हवा यावी अशी व्यवस्था न करता सदर पीकअप जीपमध्ये सहा पेक्षा जास्त जनावरे भरून दोरीने जनावरांना घट्ट बांधुन, जनावरांना भुकेलेले व तहानलेले ठेवुन जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने जनावरांची अवैध वाहतुक केली. सदर वाहतुकीदरम्यान गायीचे लहान वासरू म्हणजे काळवट हे वर नमुद परिस्थितीमुळे मरण पावले. सबब, फिर्यादी यांनी पोलीसात आरोपींविरूध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरून महाड शहर पोलीस ठाणे यांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ३४/२०१४ 'भारतीय दंड विधानचे' कलम — ३७९, ४२९ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम — ११९, महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, १९७६ कलम — ५, ६, ९, ११, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कायदा, १९६० कलम — ११(१), महाराष्ट्र किपींग ॲण्ड मुव्हमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट कलम — १३, पशु वाहतुक अधिनियम कलम — ४७(अ), ४८, ४९(अ), ५०, ५४, ५६(क) व मोटार वाहन कायद्याचे कलम १३०(१)/१७७ नुसार गुन्हा नोंदवून तपासीक अधिकारी श्री. ए. वाय. मलिक, पोलीस उपनिरीक्षक, महाड शहर पोलीस ठाणे यांनी तपास हाती घेतला. तपासादरम्यान त्यांनी आरोपींना अटक केली, घटनास्थळ पंचनामा केला व साक्षीदारांचे जबाब नोंदवून तपासाअंती आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरूध्द दोषारोप 'भारतीय दंड विधानचे' कलम — ३७९, ४२९ सह कलम ३४, मुंबई पोलीस कायदा कलम ११९, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम

११(१)(अ), महाराष्ट्र किपींग ॲण्ड मुव्हमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट, १९७६ कलम — १३, महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम, १९७६ चे कलम ५ दंडनीय कलम ९, कलम ६ दंडनीय कलम ९—अ, कलम ११ दंडनीय कलम ९—अ, पशु वाहतुक अधिनियमाचे कलम ४७—अ, ४८, ४९, ५०, ५४ व ५६ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा, १९६० चे शिक्षापात्र कलम ३८(३) व मोटार वाहन कायदा कलम १३०(१)/दंडनीय कलम १७७ अन्वये निशाणी ८ निश्चित केलेला आहे. आरोपी यांचे निवेदनास निशाणी नंबर ९ ते १२ दिलेले आहे. सदर दोषारोप निशाणी क्र. ८ आरोपींना त्यांचे बोली भाषेत वाचून दाखविला व समजावून सांगण्यात आला. परंतु आरोपी यांनी बचावाचे साक्षीदार तपासले नाहीत. तसेच आरोपी क्र. १ यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब निशाणी क्र. ८३ ते ८६ अन्वये नोंदविणेत आला.

५. अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व त्यावरील आरोपीचा बचाव यावरुन मी, खालील मुद्दे माझ्या विचारासाठी घेतले आहेत आणि त्यावरील निष्कर्ष, मी त्याखाली दिलेल्या कारणांकरिता मांडीत आहे.

| अनु.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक २८/०६/२०१४ रोजी रात्री ४.४५ वाजताचे सुमारास मौजे दासगांव, ता. महाड, जि. रायगड गावाच्या हद्दीतील दासगांव खिंडीत आरोपी यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांच्या संमतीशिवाय गायी तसेच बैल लबाडीच्या हेतुने अप्रामाणिकपणे स्वत:च्या फायद्य ाकरीता चोरून नेत असताना मिळुन आला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ३७९ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी आपसांत संगनमत करून बोलेरो जीप क्र. एम.एच.—०६—ई.—५८४९ मध्ये गुरे भरली व प्रवासादरम्यान त्यातील एका काळया रंगाच्या शिंग नसलेल्या कालवडीच्या मृत्युस कारणीभुत झाले आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ४२९ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी बोलेरो जीप क्र. एम.एच. —०६—ई.—५८४९ मध्ये गुरांची दाटीवाटीने भरती केली, तसेच त्या गुरांना घट्ट दोरीने बांधुन चारा, पाण्याची व्यवस्था न करता त्यांना क्रुर वागणुक दिली आणि त्याद्वारे मुंबई पोलीस कायदा कलम ११९ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी बोलेरो जीप क्र. एम.एच. —०६—ई.—५८४९ मध्ये गुरांची दाटीवाटीने भरती केली आणि त्यामुळे सदर गुरांच्या वेदनेस कारणीभुत झाला आणि त्याद्वारे प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० कलम ११(१)(अ) नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ५. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी वर नमुद वाहनात कोणताही परवाना नसताना शहरी विभागात गायी तसेच बैलांना ठेवले आणि त्याद्वारे महाराष्ट्र किपींग ॲण्ड मुव्हमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट, १९७६ कलम — १३ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ६. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी वर नमुद वाहनात गायी तसेच बैलांची कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतुक करत असताना मिळुन आले आणि त्याद्वारे महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, १९७६ चे कलम ५ दंडनीय कलम ९ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| ७. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी वर नमुद वाहनात कोणताही प्राधिकृत परवाना नसताना गायी तसेच बैलांची कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतुक करत असताना मिळुन आले आणि त्याद्वारे महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, १९७६ चे कलम ६ दंडनीय कलम ९—अ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ८. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी वर नमुद वाहनात गायी तसेच बैलांची कत्तल करण्यास प्रोत्साहन दिले आणि त्याद्वारे महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, १९७६ चे कलम ११ दंडनीय कलम ९—अ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ९. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी वर नमुद वाहनात गायी तसेच बैलांची वाहतुक करण्यास सक्षम असल्याचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडुन प्रमाणपत्र न घेता बैलाची व गायीची वाहतुक केली, तसेच त्या वाहनामध्ये प्रथम उपचार पेटी तसेच प्रस्तुत वाहकाचे नाव, पत्ता, फोन क्रमांक, जनावरे कोणाची आहेत, ती कोणाला पोहोचवाची आहेत त्यांची नावे असणारी पट्टी वाहनाला लावली नव्हती, तसेच त्या जनावरांना त्या वाहनात पुरेशी जागा नव्हती, पाण्याची व्यवस्था केलेली नव्हती आणि कलम ५६ मध्ये नमुद केलेल्या वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केले आणि त्याद्वारे पशु वाहतुक अधिनियमाचे कलम ४७—अ, ४८, ४९, ५०, ५४ व ५६ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा, १९६० चे शिक्षापात्र कलम ३८(३) नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| १०. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ यांनी वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालविण्याचा परवाना नसताना चालविले आणि मोटार वाहन कायदा कलम १३०(१)/दंडनीय कलम १७७ नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .. नाही. |
| ११. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

६. मी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के. व्ही. कदम व आरोपी यांचे विद्वान वकील श्री. आर. आर. गांधी यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने साक्षीदार क्रमांक १ श्री. मिलींद भास्कर धारप यांची साक्ष निशाणी क्र. १५ अन्वये, साक्षीदार क्र. २ पंच श्री. परवेज रेहमुद्दीन अन्वारे यांची साक्ष निशाणी क्र. १७ अन्वये, साक्षीदार क्र. ३ श्री. चेतन विष्णु उतेकर यांची साक्ष निशाणी क्र. २४ अन्वये, साक्षीदार क्र. ४ श्री. जयवंत मोरेश्वर पाटील यांची साक्ष निशाणी क्र. २८ अन्वये नोंदविल्या आहेत. आरोपीचे वकीलांनी बचावाचे साक्षीदार तपासलेले नाहीत.

७. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. के. व्ही. कदम यांचा युक्तीवाद आहे की, सदर प्रकरणामध्ये आरोपींविरूध्द अनेक प्रकारच्या पशु संदर्भातील अधिनियम कलम लावले आहेत. सदर प्रकरणात एकुण ४ साक्षीदार तपासले आहेत. वारंवार प्रयत्न करून व साक्ष समन्स पाठवुन देखील तपासीक अधिकारी मुंबईला असल्याकारणाने कोर्टापुढे हजर राहिलेले नाहीत. वॉरंट काढुनही ते बजावलेले नाही. तसेच तपासीक अधिकारी यांना व्हिडीओ कॉन्फरंसिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करूनही त्यांनी कॉल अटेंड केलेला नाही. विविध प्रकारच्या गायी, एक बैल असे कोंबुन भरून त्यांची व्यवस्था न करता आणले होते. त्याचा पंचनामा निशाणी क्र. १६ वर करणेत आलेला आहे. निशाणी क्रमांक पडलेला आहे याचा अर्थ सदर पंचनामा शाबीत झालेला आहे. जप्ती पंचनामा पोलीस ठाण्यात आणुन पोलीस ठाण्याच्या आवारात केला आहे.

८. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. के. व्ही. कदम यांचा

पुढे युक्तीवाद आहे की, साक्षीदार क्र. ३ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन तिऱ्हाईत इसम आहेत. त्यांनी आरोपीचे व क्लिनरचे नांव सांगितले आहे. प्राणी कोंबुन आणल्याचे देखील आढळुन आले आहे. साक्षीदार क्र. ४ हा पोलीस साक्षीदार असुन त्यांनी बोलेरो जीप क्रमांक सांगितलेला आहे. जीपचे मालकीचे कागदपत्र दिले नाही याचाच अर्थ सदरची जीप चोरीची असु शकते. आरोपींकडे गुरं वाहतुकीचा परवाना नव्हता. तसेच सदर प्रकरणातील फिर्यादी यांना साक्ष समन्स काढणेत आले होते. परंतु, ते बोलण्याच्या अवस्थेत नाहीत, काहीच बोलु शकत नाहीत. सदर संदर्भात वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविणेचा प्रयत्न केला. परंतु, ते प्राप्त झाले नाही. सबब, आहे तो पुरावा ग्राहय धरून आरोपी यांना कडक शासन होणेची विनंती केली आहे.

९. आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. आर. आर. गांधी यांचा युक्तीवाद आहे की, सदर प्रकरणातील आरोपी क्र. ३ व ४ घटनास्थळावर घटनेच्यावेळी नव्हतेच. आरोपींवरील आरोप सिध्द करणेकरीता अभियोगपक्षाने एकुण ४ साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र. १ याने जीपमध्ये प्राणी भरून नेल्याचे सांगितले आहे. तेव्हा पावसाचे दिवस होते व साक्षीदार क्र. १ याची दुसरी शिफ्ट होती. पंचनामा लॅपटॉपवर केलेला आहे. त्यामध्ये साक्षीदाराने फक्त लॅपटॉप या शब्दाचा उल्लेख केलेला नाही. उलटतपासाप्रमाणे घटनास्थळावर पंचनामा केला नाही ही मान्य बाब आहे. साक्षीदार क्र. २ हे फितुर साक्षीदार असुन साक्षीदार क्र. ३ हे ऐकीव साक्षीदार आहेत. साक्षीदारांपैकी एक साक्षीदार गोशाळेचा अध्यक्ष आहे व दुसरा सभासद आहे. साक्षीदार क्र. ३ यास ठिकाण माहिती नाही. साक्षीदार क्र. ४ यांच्या उलटतपासामध्ये जीप चालक याचेबाबत माहिती नाही. साक्षीदाराने वैयक्तिक काही पाहिलेले नाही असे स्पष्ट सांगितले आहे. प्रस्तुत प्रकरणातील मिलींद म्हात्रे हे

फिर्यादी असुन त्यांना अभियोगपक्षाने साक्षीदार म्हणुन तपासलेले नाही. तसेच तपासीक अधिकारी यांना देखील तपासलेले नाही. त्यामुळे पंचनामा शाबीत झाला असे म्हणता येणार नाही. गुरं चोरून आणली हे देखील सिध्द झालेले नाही. सदर प्रकरणात स्वतंत्र साक्षीदार नाही. सबब, या सर्व कारणांस्तव आरोपींस निर्दोष मुक्त करणेत यावे अशी विनंती केली आहे.

वरील दिलेली तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता मुद्दे क्र. १ ते १० यांचे संयुक्त खालीलप्रमाणे कारणमिमांसा देत आहे.

**मुद्दे क्र. १ ते १० करीता :—**

१०. आरोपींवरील आरोप सिध्द करणेकरीता अभियोगपक्षाने एकुण ४ साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र. २ हे फितुर साक्षीदार असुन साक्षीदार क्र. ३ हे ऐकीव साक्षीदार आहेत. वारंवार प्रयत्न करून व साक्ष समन्स पाठवुन देखील तपासीक अधिकारी मुंबईला असल्याकारणाने कोर्टापुढे हजर राहिलेले नाहीत. वॉरंट काढुनही ते बजावलेले नाही. तसेच तपासीक अधिकारी यांना व्हिडीओ कॉन्फरंसिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करूनही त्यांनी कॉल अटेंड केलेला नाही. तसेच सदर प्रकरणातील फिर्यादी यांना साक्ष समन्स काढणेत आले होते. परंतु, ते बोलण्याच्या अवस्थेत नाहीत, काहीच बोलु शकत नाहीत. सदर संदर्भात वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविणेचा प्रयत्न केला. परंतु, ते प्राप्त झाले नाही.

११. सहाय्यक सरकारी वकील यांनी युक्तीवादात कथन केले आहे की, पंचनाम्यास निशाणी क्रमांक पडला याचा अर्थ तो शाबीत झाला. परंतु, तसे होत नाही. पंचनाम्यास निशाणी पडल्यावर तो फक्त पुराव्यात वाचला जातो. परंतु, त्यातील मजकुर सविस्तररित्या पंचांमार्फत शाबीत होणे देखील गरजेचे असते. मात्र असे सदर प्रकरणात झाल्याचे

दिसुन येत नाही. साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास पाहिला असता त्यामध्ये त्यांनी दुसऱ्या शिफ्टची वेळ दुपारी ३.०० ते रात्री ११.०० असते असे सांगितले आहे. सदर साक्षीदार क्र. १ मिलींद धारप पंचनाम्यावरील पंच क्र. १ आहेत व पंचनाम्याची वेळ वेगळी आहे. त्यांनी हे मान्य केले आहे की, घटनेवेळी ते सावली शाळेचे अध्यक्ष होते. त्यांनी मान्य करून सांगितले आहे की, हवालदार पिंगळे यांनी त्यांचेकडे गुरे ठेवायला जागा नसल्याने तुम्ही गुरे ठेवाल का अशी विचारणा केली होती. गुरे घेण्यासाठी ते पोलीस ठाण्यात आले होते. साक्षीदार क्र. १ हे पंच असुन त्यांना प्रत्येक जनावराचे वर्णन सांगता आलेले नाही. तसेच मान्य केले आहे की, पंचनामा पोलिसांनी त्यांच्या कार्यालयात संगणकावर तयार केला आहे. तसेच त्यांनी पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात सही केली आहे. याचाच अर्थ पंचनामा घटनास्थळावर तयार केलेला नाही.

१२. साक्षीदार क्र. १ यांनी पंचनाम्याबाबत सांगताना सांगितले आहे की, पंचनामा केल्याचे ठिकाण आणि गाडीमधील अंतर सुमारे २५ जे ३० फुट होते. त्यानंतर मान्य केले आहे की, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला नाही. साक्षीदार क्र. ३ याने सरतपासामध्ये जीपच्या चालकाचे नांव म्हणजे आरोपीचे नांव महम्मद शेख असल्याचे सांगितले आहे व शादाब क्लिनरचे नांव असल्याचे सांगितले आहे. त्यानंतर उलटतपासामध्ये त्यांनी सांगितले आहे की, ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष होते. ते समाज सेवा करतात. त्यामुळे त्यांचे पोलिसांशी चांगले संबंध आहेत. फोन आल्यानंतर ते प्रथम मुंबई–गोवा महामार्गाशेजारी बुटाला हॉलजवळ गेले होते. बुटाला हॉल दोशी ऑटोमोबाईलजवळ आहे. बुटाला हॉलसमोर सुंदरवाडी गाव आहे. परंतु हे तीनही ठिकाणी विशिष्ट लांब अंतरावर असुन वेगवेगळी आहेत. साक्षीदार क्र. ३ यांनी सांगितले आहे की, ते

बुटाला हॉलसमोर घडलेल्या घटनेसंबंधी साक्ष देत आहेत. परंतु, सदरचे ठिकाण हे या प्रकरणातील कोणतेही ठिकाण नाही.

१३. साक्षीदार क्र. ४ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये सांगितले आहे की, जीप चालकास त्यांनी पाहिले नाही. घटनेवेळी देखील त्याला पाहिलेले नाही. त्यामुळे जीप चालकास म्हणजेच आरोपीस ते ओळखु शकलेले नाहीत. साक्षीदार क्र. ४ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, पंचनाम्यासाठी दुसरे पंचासह दासगांव जवळ महामार्गावर थांबले असता त्यावेळी पोलीस जीपचा चालक होता. साक्षीदार जीपमध्येच बसुन होते. गाडीबाहेर पोलीस निरीक्षक शिंदे व पोलीस हवालदार म्हात्रे काम करीत होते. परत महाडला जीप घेउन आल्यानंतर त्यामध्ये जनावरे असल्याचे त्यांना समजले होते. सदर साक्षीदार यांनी ते डोळयांनी पाहिलेले नाही. सदर जीप क्र. एम.एच.—४६—ई.—५८४९ चा मालक कोण व चालक कोण हे त्यांनी स्वत: पाहिलेले नाही असे सांगितले आहे. जीपचा क्लिनर कोण होता हे देखील त्यांना माहिती नाही. सबब, साक्षीदार क्र. १ ते ४ यांची साक्ष ग्राहय धरणेस पात्र नाही. सदरचे प्रकरण हे पुराव्यानिशी सिध्द झालेले नाही. सदर प्रकरणामध्ये प्रत्यक्षदर्शी किंवा स्वतंत्र साक्षीदार मिळुन आलेला नाही. सबब, मी वरील सर्व कारणांस्तव मुद्दे क्र. १ ते १० चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ११ करीता :—</u>**

१४. आरोपींवरील आरोप संशयापलीकडे जावुन सिध्द करण्याकरिता आरोपींविरुध्द पुराव्याअभावी अभियोगपक्षाला आरोपीवरील आरोप संशयापलीकडे जाउन सिध्द करण्यात यश आले नाही, म्हणून मी खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. आरोपी क्र. १ महम्मद परवेझ ताहिर शेख, आरोपी क्र. २ शादाफ अफरोझ कुरैशी, आरोपी क्र. ३ अब्दुल हमीद अब्दुल गफुर पटेल, आरोपी क्र. ४ सलीम इसाक कापडी यांची 'भारतीय दंड विधानचे' कलम — ३७९, ४२९ सह कलम ३४, मुंबई पोलीस कायदा कलम ११९, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११(१)(अ), महाराष्ट्र किपींग ॲण्ड मुव्हमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट, १९७६ कलम — १३, महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, १९७६ चे कलम ५ दंडनीय कलम ९, कलम ६ दंडनीय कलम ९—अ, कलम ११ दंडनीय कलम ९—अ, पशु वाहतुक अधिनियमाचे कलम ४७—अ, ४८, ४९, ५०, ५४ व ५६ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे शिक्षापात्र कलम ३८(३) व मोटार वाहन कायद्याचे कलम १३०(१) दंडनीय कलम १७७ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपांतून कलम २४८(१) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी कलम ४३७—अ (१) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार त्यांचे रू. १०,०००/— चे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे.

PUJA SANKET MALI
Digitally signed by PUJA SANKET MALI
Date: 2026.03.11 16:32:00 +0530

महाड
दिनांक : १०/०३/२०२६

(श्रीमती पी. एस. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | | Smt. P. B. Ringe |
| (b) | Presiding Officer | | Smt. P. S. Mali<br>Jt. Civil Judge J.D.& J.M.F.C., Mahad. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | | 10/03/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | | 10/03/2026 |